CNR-MHYA120007372024 नि.दि.दा.क्र.५६/२०२४

प्रकाश+१ –वि.– लिलाबाई+४

## नि.क्र.१९ वरील आदेश

०१. अर्जदार क्र.१ ते ५ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) नुसार अर्जदार यांना दाव्यामध्ये पक्ष म्हणुन जोडणे करीता प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

०२. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे असे कथन आहे की, सदर दावा वादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेसोबत संगणमत करुन अर्जदार क्र.१ याचे पिता गुलाब किसन राठोड याचे मालकी ताब्यातील मौजा आमणी खु., ता. महागाव, जि. यवतमाळ येथे शेत भूमापन क्र.९३ क्षे. २ हे. ८३ आर आका ३.५० रु.पै. ज्याच्या चतुःसिमा पुर्वेस – अमोल गायकवाड यांचे शेत, पश्चिमेस – राधेशाम काळबांडे याचे शेत, उत्तरेस – मिलींद काळबांडे यांचे शेत, दक्षिणेस – जंगल या मालमत्ते विरुध्द अर्जदार याचेबाबतची संपुर्ण माहिती व पुर्वीचे न्यायालयीन प्रकरणाबाबतची संपुर्ण वस्तुस्थिती लपवुन दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये काहीही निकाल लागला तरी अर्जदार याचेवर अन्यायकारक असुन वादमालमत्तेचे वस्तुस्थितीबाबत सत्य परिस्थिती आणि दाव्याचा योग्य निर्णय होणेकरीता अर्जदार यांची उपस्थिती आवश्यक व योग्य आहे. त्याशिवाय दाव्याचा कायदेशीर निकाल लागु शकत नाही अथवा झालेल्या निकालाची अंमलबजावणी होवु शकत नाही.

०३. वादातील मालमत्ता ही अर्जदार यांचे वडील गुलाब किसन राठोड यांना शासनामार्फत कायम पट्याने मिळालेली असुन त्यापूर्वी वादातील मालमत्ता ही अर्जदर यांचे आजोबा किसन राठोड यांनी स्वतः अंगमेहनतीने वहीतीत काढून त्यांचे हयातीपर्यंत वहीती केली व त्यांचे मृत्युनंतर वादातील मालमत्तेचे अर्जदार यांचे वडील गुलाब यांनी वहिती सुरु केल्यानंतर सन १९६४ मध्ये वादीचे वडील गुलाब यांना वादातील मालमत्ता कायम पट्याने मिळालेली आहे.

०४. वादीचे आजोबा किसन यांनी वाद मालमत्तेसोबतच मौजा माळवाकद येथे शेत स.नं.१२०/४ क्षे. २हे. ०आर ही शेतजमिन सुध्दा वहितीत काढली होती. अर्जदार यांचे आजोबा किसन यांना एकुण तीन मुले गुलाब, बंन्सी व शिक अशी मुले होती. त्यापैकी शिक हे अविवाहीत स्थितीत निघुन गेले. मयत गुलाब यांना अर्जदार क्र.१ ते ५ व मयत

भिमणीबाई अशा सहा मुली झाल्या. त्यांना मुलगा अपत्य नव्हता आणि अर्जदार यांचे काका बन्सी यांना खेमा बन्सी राठोड हा एकमेव मुलगा व तीन मुली होत्या. अशाप्रकारे त्यांचे वडील गुलाब व काका बन्सी या दोघांमध्ये केवळ खेमा बन्सी राठोड हा एकमेव मुलगा होता, त्यामुळे मयत बन्सी याचे मृत्युनंतर त्याचे वडील गुलाब यांनी सहा बहीणीसह चुलत भाउ खेमा बन्सी राठोड व त्याच्या तिन्ही बहिणी असा मोठा परिवार एकत्रीत ठेवला होता. केवळ स्वतंत्र कुटुंबाची व्यवस्था म्हणुन मौजा माळवाकद व मौजा आमणी खु. येथील शेतजमिनीची योग्य वहितीकरीता खेमा राठोड यांना मौजे सातघरी, ता. महागाव येथे वास्तव्यास ठेवले होते व स्वतः आमणी येथे राहात होते परंतु, दोन्ही शेतजमिनीची वहिती व उत्पन्न एकत्रीत घेत होते.

०५. शासनामार्फत त्यांचे वहितीतील शेतजमीनी भूमीधारी हक्काने कायम पट्यानुसार देणेबाबतच्या योजनेमध्ये वादातील मालमत्ता ही अर्जदार यांचे वडील मयत गुलाब यांचे नावाने कायम करण्यात आले आणि मौजे सातघरी येथील शेत स.नं.१२०/४ क्षेत्रफळ २ हे. ० आर ही शेतजमीन अर्जदार यांचा चुलत भाउ खेमा बन्सी राठोड यांचे नावाने करण्यात आली. अर्जदार यांचा चुलत भाउ खेमा यास एकुण चार मुले प्रसनदास, रोहीदास, लहु, अशोक व एक मुलगी कलमबाई अशी अपत्य होती आणि त्यांचे नावावर केवळ ५ एकर शेतजमीन असल्याने अर्जदार यांचे चुलत भाउ खेमा बन्सी यांनी अर्जदार यांचे वडील गुलाब यांचे हिस्यातून शेजमिनीची मागणी करण्यास सुरुवात केली. त्यास अर्जदार यांचे वडील यांनी अर्जदार यांच्या विवाहानंतर पाहु असे म्हणुन त्यावेळी नकार दिला. त्यावरुन अर्जदार यांचे भाउ खेमा बन्सी यांनी मयत गुलाब यांना त्यांचे मुलापैकी एखाद्याला दत्तक घेण्याचा प्रस्ताव मांडला. त्यास मयत गुलाब यांनी स्पष्टपणे नकार दिला. त्यानंतर मयत खेमा यांनी खोटे व बनावट दस्तऐवज तयार करण्यास सुरुवात केली. तसेच, अर्जदार यांचे वडील गुलाब यांचेसोबत वाद निर्माण करुन संपुर्ण अपत्यासह मौजा सातघरी येथे कायमस्वरुपी राहावयास गेला. दरम्यान सन १९८१ मध्ये अर्जदार क्र.५ ही अज्ञान असतांना अर्जदार यांचे वडील गुलाब यांचा देहांत झाला. त्यानंतर मयत गुलाब यांच्या मालमत्तेची अर्जदार क्र.१ ते ४ यांनी स्वतः व आपले पतीच्या सहायाने वहीती करुन अर्जदार क्र.१ हिने अज्ञान अर्जदर क्र.५ हिचे पालनपोषण करुन मयत गुलाब यांच्या शेतजमिनीची स्वतः वहिती चालु केली.

०६. त्यानंतर अर्जदार यांचा चुलत भाउ खेमा बन्सी राठोड यांनी अर्जदार यांचे वडील मयत गुलाब यांचे मृत्युनंतर अर्जदार यांनी वादमालमत्तेची स्वतंत्र वहीती चालु केल्यानंतर अर्जदार यांना वादमालमत्तेतून बेदखल करण्याच्या हेतूने सन १९८२ मध्ये अर्जदार क्र.१ ते ५ तसेच, अर्जदार क्र.१ ते ४ यांचे पती यांचे विरुध्द खोटा व बनावट दत्तक पत्र व बक्षीसपत्राबाबत मांडणी करुन दावा दाखल करुन ताबा घेण्याचा प्रयत्न केला परंतु, सदर दावा हा खारीज झाला, त्यामुळे अर्जदार यांचा भाउ खेमा बन्सी राठोड यांना वादमालमत्तेचा ताबा घेता येवू शकला नाही.

०७. अशाप्रकारे वादातील मालमत्ता ही सन १९८१ पासून अर्जदार यांचे वहितीत असुन अर्जदार क्र.१ ते ५ यांनी वादातील मालमत्तेमध्ये पुर्व – पश्चिम धुरा पाडुन दक्षीणेकडील जंगलात लागुन २ एकर शेतजमीन प्रतिवादी क्र.१ चे पती तथा प्रतिवादी क्र.२ ते ५ चे पिता मयत लहु खेमा राठोड यांना वहितीत देवुन उर्वरीत शेतजमीन मयत लहु यांचे मार्फत वहिती करुन घेतली आणि आजस्थितीत वादातील मालमत्तेपैकी दक्षिणेकडील २ एकर शेतजमीन वगळता उर्वरीत उत्तरेकडील शेतजमीन अर्जदार क्र.१ ते ५ यांचे ताब्यात आहे. असे असतांनाही वादी व प्रतिवादी यांनी संगणमत करुन अर्जदार यांना वादमालमत्तेतून बेदखल करण्याच्या हेतूने दावा दाखल केलेला आहे. वादातील मालमत्ता ही अर्जदार यांचे वडील मयत गुलाब यांची वडीलोपार्जीत मालमत्ता असुन त्यात अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. तसेच, सन १९८१ पासुन वादातील मालमत्ता ही अर्जदार यांचे स्वतंत्ररीत्या वारसाहक्काने मालकी व ताब्यात आहे. त्यामुळे अर्जदार यांना प्रस्तूत दाव्यामध्ये पक्ष म्हणुन जोडणे जरुरी आहे करिता अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०८. प्रतिवादींनी त्यांचे लेखी म्हणने नि.क्र.२७ प्रमाणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली व कथन केले की, वादींनी प्रतिवादीं विरुध्द वादशेताचे मालकी ताबा वापर वहीती व उपभोगास प्रतिवादींनी स्वतः अगर ईतर कोणाही मार्फत कधीही अडथळा करु नये असा कायमस्वरुपाचा मनाईहुकूम मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. यामध्ये वादींनी दि.प्र.स. आदेश ३९ नियम १ व २ तथा धारा १५१ नुसार मुळ दाव्याचा निर्णय होईपर्यंत वादशेताचे वादींचे मालकी, ताबा, वापर, वहिती व उपभोगास प्रतिवादींनी स्वतः अगर ईतर कोणाही मार्फत अडथळा करु नये असा एकतर्फी तात्पुरत्या स्वरुपाचा मनाईहुकूम

मिळणेसाठी सदर दाव्यात अर्ज सादर केला.

०९. प्रतिवादींनी दिनांक २०/०९/२०२४ रोजी दि.प्र.सं. आदेश १ नियम १० अनुसार अर्जदार यांना दाव्यामध्ये पक्ष म्हणुन जोडण्याबाबत आवेदनपत्र सादर केले. वास्तविक पाहाता प्रकाश गुलाब राठोड यांना गुलाब किसन राठोड यांनी सन १९७७ मध्ये मुलगा अपत्य नसल्याने वादी क्र.१ प्रकाश यांना दत्तक घेतले आहे. वादी क्र.१ प्रकाश गुलाब राठोड यांचे दत्तकापुर्वीचे नाव रोहिदास खेमा असे होते. वादी क्र.१ प्रकाश यांना गुलाब राठोड औरस पुत्राप्रमाणे त्यांचे इस्टेटीमध्ये हक्क प्राप्त झाला आहे. वादी क्र.१ यांचे दत्तक वडील गुलाब किसन राठोड हे सन १९८१ मध्ये मृत्यु पावले आहेत. त्यांच्या मृत्युपश्चात मौजा आमणी खु., ता. महागाव, जि. यवतमाळ येथील शेत भूमापन क्र.९३ क्षेत्र २ हे. ८३ आर आकार रुपये ३.५० पैसे या शेतजमिनीचे वारसाहक्काने कायदेशीर मालक व कब्जेदार झाले आहेत. तसा महसूल रेकॉर्डला फेरफार क्र.४६ दिनांक २०/०५/१९८६ रोजी रुजु झाला आहे.

१०. अर्जदार मेथीबाई सवाराम जाधव, जमुनाबाई वसराम जाधव, मंगलाबाई पांडु चव्हाण, यमुनाबाई नागोराव जाधव, रत्नप्रकाश जाधव हे अर्जदार गुलाब किसन राठोड यांच्या मुली आहेत. वरील अर्जदार यांचे लग्नकार्य अर्जदार क्र.१ ते ५ यांचे समाजातील रितीरिवाजप्रमाणे वादींचे वडील व वादी यांनी सर्वांचे विवाह करुन दिले आहे व ते आपआपल्या घरी सुखाचा संसार करीत आहेत. वादींचे वडील गुलाब किसन राठोड यांनी मुलगा अपत्य नसल्याकारणाने व आपसी सुसृशा व आपली देखरेख करण्याकरीता आपला वारसा पुढे चालविण्याकरीता वादीला कायदेशीर दत्तक घेतले आहे. त्यानंतर गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती बोलवून सन १९८० मध्ये सर्व मुलींना घरी बोलवुन घेतले त्यावेळी सर्वांना शेतीचा हिस्सा म्हणुन रक्कम रुपये ९५००/– एकमुस्त रक्कम दिली व त्याबदल्यात गुलाब किसन राठोड यांच्या पाचही मुलींनी दाव्यातील शेतजमिनीवरील त्यांचा हक्क सोडून दिला व पुन्हा सदर शेतजमिनीबाबत वाद करणार नाही व कोठेही तक्रार करणार नाही याबाबत त्याचेसमोर व ईतर पंचासमोर कबुल केले होते. त्यानंतर गुलाब किसन राठोड यांचा मृत्यु झाला. त्याचे मृत्युनंतर दत्तक पत्रानुसार वादी क्र.१ हे शेतजमिनीचे मालक व कब्जेदार झाले व त्याचे नावाने सदर शेतजमिनीचे मालकी हक्काबाबत फेरफार रुजु करण्यात आला. तसेच, हा व्यवहार तोंडी स्वरुपाचा साक्षीदारासमक्ष ठरला होता. सा.क्र.१ रविंद्र रामराव

जाधव सा.क्र.२ प्रल्हाद मारोती कदम यांनी तशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र या दाव्यामध्ये दाखल केले आहे.

११. अर्जदार यांनी नि.क्र.१९ चे आवेदनपत्र सादर केले आहे ते चुकीचे व बेकायदेशीर असल्याकारणाने सदर अर्ज खारिज करण्यात यावा. केवळ वादींची शेतजमिन बळकाविण्याकरीता व वादीस त्रास देण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वादींनी प्रतिवादीं विरुध्द वादशेतजमिनीचे वहीतीस व उपभोगास अडथळा निर्माण करु नये म्हणुन कायमचा मनाईहुकूम मिळण्याकरीता व तात्पुरता मनाईहुकूम मिळण्याकरीता सदरचा दावा दाखल कला आहे. करिता दाखल केलेला अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

१२. अर्जदार व वादी यांची कथेने विचारात घेता खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी सदर मुद्दयावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय? | **..होकारार्थी..** |
| ०२. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

१३. अर्जदार तर्फे विधीज्ञ **श्री. एस.बी.नाईक** यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच, वादी तर्फे विधीज्ञ **श्री. एस.आर.राउत** यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

:: **कारणमिमांसा** ::

**मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः**

१४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींनी वादमालमत्तेच्या संदर्भाने निरंतर मनाईचा आदेश होवुन मिळण्यासाठी प्रतिवादीं विरुध्द दावा दाखल केला आहे. तसेच, वादींचे कथन आहे की, वादमालमत्ता ही वादी प्रकाश राठोड याचे वडील गुलाब किसन राठोड यांना शासनाकडुन मिळाली आहे. तसेच, गुलाब किसन राठोड यांना मुलगा अपत्य नसल्यामूळे सन १९७७ साली वादी क्र.१ प्रकाश याला

गुलाब राठोड यांनी दत्तक घेतले आहे. वादी क्र.१ हा गुलाब याचा दत्तक पुत्र आहे. गुलाब राठोड हे सन १९८१ साली मयत झाला आहे, त्यामुळे वादी क्र.१ प्रकाश राठोड हा मौजा आमणी खु., ता. महागाव येथील शेत भूमापन क्र.९३ क्षेत्रफळ २हे. ८३आर या शेतजमिनीचा वारसाहक्काने कायदेशीर मालक व कब्जेदार झाला आहे. महसूल रेकॉर्डला फेरफार क्र.४६ दिनांक २०/०५/१९८६ रोजी करण्यात आला आहे. त्यानंतर वादी क्र.१ याने वादमालमत्ता ही आपसात वाटणी करुन सर्वे नं.९३ मधिल १हे. २१आर शेतजमीन वदी क्र.२ सुमनबाई हिला वाटुन दिली आहे. वादमालमत्तेवर वादीचा ताबा, वापर व वहिती आहे.

१५. परंतु, नि.क्र.१९ वरील अर्जास वादींनी नि.क्र.२७ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार क्र.१ ते ५ या गुलाब किसन राठोड याच्या मुली असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच, अर्जदार यांनी वादी क्र.१ हा गुलाब याचा दत्तक पुत्र असल्याचे अर्जामध्ये नाकारले आहे व दाव्यातील मालमत्तेमध्ये अर्जदार क्र.१ ते ५ यांचाच हक्क व हिस्सा असल्याचे अर्जामध्ये नमुद केलेले आहे. वादी क्र.१ प्रकाश याने नि.क्र.२७ वरील त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार मेथीबाई जाधव, जमुनाबाई जाधव, मांगलीबाई चव्हाण, यमुना चव्हाण, रत्नप्रकाश जाधव यांनी वडीलार्जीत शेतितील हिस्सा म्हणुन रक्कम रुपये ९,५००/- सन १९८० साली पंचासमक्ष स्विकारली व त्यांनी दाव्यातील शेतजमिनीवरील हक्क सोडुन दिलेला आहे व तसे त्यांनी वादी व पंचासमोर कबुल केले आहे असे नमुद केले आहे. परंतु, वादींनी त्यांच्या दाव्यामध्ये अर्जदार म्हणजेच मयत गुलाब किसन राठोड याच्या पाच मुलींनी वादमालमत्तेतील हक्क रोख रक्कम स्वीकारुन सोडुन दिला आहे, असे दाव्यात नमुद केलेले नाही, त्यामुळे प्रस्तूत दावा प्रकरण जरी प्रतिवादीं विरुध्द निरंतर मनाईचा आदेश हेवुन मिळण्यासाठी दाखल केले असले तरी, त्या मिळकतीचा वादी क्र.१ हा मालक व ताबेदार असल्याचे अर्जदारांनी नाकारलेले आहे. तसेच, वादमालत्तेवर मयत गुलाब याच्या पाच मुली म्हणजेच अर्जदार याचा सन १९८१ पासून ताबा व वहिती असल्याचे अर्जदारांचे कथन आहे. त्यामुळे दि.प्र.सं. आदेश १ नियम १०(२) नुसार

अर्जदार हे प्रस्तूत दावामिळकतीच्या संदर्भाने आवश्यक पक्षकार असल्याचे दिसुन येते कारण अर्जदार ह्या गुलाब राठोड याच्या मुली असल्याचे वादीने मान्य केले आहे. तसेच, वादींचे कथन आहे की, प्रस्तूत अर्जदार यांनी त्यांचा वादमालमत्तेतील हक्क रोख रक्कम स्वीकारुन सोडुन दिलेला आहे परंतु, वादींनी ती बाब पुराव्यानिशी शाबीत करणे आवश्यक आहे व तसे शाबीत करतांना ज्या व्यक्तींनी वादमालमत्तेतील हक्क सोडुन दिला त्या व्यक्तींना म्हणजेच अर्जदार क्र.१ ते ५ यांना या दाव्यामध्ये पक्षकार करुन नैसर्गीक न्यायतत्वानुसार त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे त्याशिवाय दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय होणे अशक्य आहे. म्हणुन प्रस्तूत अर्जदार यांना दाव्यामध्ये पक्षकार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांना पक्षकार केल्यास वादमालमत्तेच्या संदर्भाने असलेल्या संपुर्ण वादाचे निराकरण करणे आणि दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय करणे शक्य होणारे आहे.

१६. याकामी वादींचे विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या पुढील न्यायनिर्णयावर ठेवली आहे. जे. मंजुकुमार वि. श्री. व्ही.व्यंकटेश (निकाल तारीख ३०/०६/२०१४) सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर न्यायनिर्णयातील हकिकत व प्रस्तूत दावा प्रकरणातील व अर्जातील हकिकत ही भिन्न आहे, त्यामुळे त्या न्यायनिर्णयातील न्यायनिर्णय या वादींना उपयुक्त पडणार नाही. अर्जदार तर्फे विधिज्ञांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या पुढील न्यायनिर्णयावर आपली भिस्त ठेवली आहे. **अशोक बाबाराव पाटील वि. महाराष्ट्र राज्य व ईतर निकाल दिनांक ११/१०/२०२२ डीएलडी(सिव्हील)- २०२२-१६६२**. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर न्यायनिर्णय, त्यातील हकिकत व निर्णयमुलादार हे प्रस्तूत अर्जातील कथन व दाव्यातील हकिकत यास उपयोगी ठरणार आहे. प्रस्तूत अर्जदार यांनी वादींचा वादमालमत्तेवरील मालकी हक्क व कब्जा नाकारला आहे व अर्जदार यांचा दावामिळकतीमध्ये मालकी हक्क, हिस्सा व कब्जा असल्याचे कथन केलेले आहे. अशापरिस्थितीत वर नमुद केलेली कारणमिमांसा विचारात घेता प्रस्तूत अर्जदार यांना दावा प्रकरणात प्रतिवादींचे सदरात समाविष्ट करणे आवश्यक

आहे. त्यांना दाव्यात पक्षकार न केल्यास वादमालमत्तेच्या संदर्भाने असलेल्या संपुर्ण व ख–या वादाचे निराकरण या दावा प्रकरणात करता येणार नाही. त्याकरीता प्रस्तूत पक्षकार यांना त्यांच्या हक्काबाबत वेगळे प्रकरण दाखल करावे लागणार आहे, त्यामुळे वादमालमत्तेच्या संदर्भाने असलेल्या वादाचे अनेकिकरण होणार आहे. त्यामुळे वादाचे अनेकिकरण टाळण्याकरीता व वादमालमत्तेच्या संदर्भाने वादी व प्रतिवादींचे हक्क ठरविण्याकरीता आणि संपुर्ण वादाचे निराकरण करण्यासाठी अर्जदार यांना दाव्यात प्रतिवादी करणे अत्यंत आवश्यक आहे, त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजूर करणे योग्य व कायदेशीर होणार आहे, म्हणून मी मुद्दा क्र.०१ चा निष्कर्ष होकारार्थी देतो व मुद्दा क्र.०२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.१९ वरील अर्ज मंजूर करण्यात आला.

०२. वादींना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी नि.क्र.१९ वरील अर्जदार यांना मुळ दावा प्रकरणात प्रतिवादी म्हणुन सामील करावे.

०३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR
Date: 2025.03.19 10:25:24 +0530

(एस.एम.कोळेकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
महागांव

दिनांकः १९/०३/२०२५